ISSN : 2278-9308
Impact Factor : 3.20

Shri Jagadamba Vinkar Shikshan Sanstha's

# Jagadamba Mahavidyalaya, Achalpur City

## Aadhar Social Research and Development Training Institute, Amravati

Jointly Organising

One Day National Interdisciplinary Conference on

# Contribution of National and International Thinkers to the Social and Literary Development of India

Saturday 21st January 2017



| | | | |
|---|---|---|---|
| 17 | डॉ. ए. डी. जाधव | योगी अरविंद घोष यांच्या विचारांचे भारताच्या राजकीय जडणघडणीत योगदान | 54 |
| 18 | प्रा.डॉ. वैशाली बाबुराव कोटंबे | शिक्षणाच्या सार्वत्रिककरणाचे जनक : महात्मा जोतिबा फुले | 58 |
| 19 | प्रा.डॉ.आर.जी. अंबाडकर | विष्णुगुप्त यांचे आर्थिक विचारातील योगदान | 62 |
| 20 | प्रा. एम. पी. चोपडे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार आणि भारतीय अर्थव्यवस्था | 64 |
| 21 | प्रा.डॉ.बी.एस.भालेराव | कल्याणकारी अर्थशास्त्रात बुद्धाच्या दारिद्रयाविषयक संकल्पनेचे योगदान | 67 |
| 22 | प्रा. कृष्णा आ. माहुरे | भारताच्या सामाजिक जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | 70 |
| 23 | प्रा.राजेंद्र एस. घोरपडे | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचे अध्ययन | 73 |
| 24 | प्रा.कु.कल्पना रामकृष्ण राउत | रा-या जगाची माय सावित्रीबाई फुले सामाजिक कार्य | 76 |
| 25 | डॉ.सुभाष रामचन्द गुर्जर | महात्मा ज्योतीराव फुलें यांची आर्थिक विचार धारा | 79 |
| 26 | डॉ. स्मिता गवई | भारतीय महिलाओं के विकास में तथागत गौतम बुध्द और डॉ.बाबासाहेब आंबेडकर का योगदान | 81 |
| 27 | शिवम म. ठाकुर | राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज | 84 |
| 28 | प्रा. डॉ. गोपीचंद या. कठाणे | परिर्वनवादी लढयाचे अग्रणी – महात्मा फुले | 87 |
| 29 | प्रा. डॉ. संतोष एन. ताडे | खराट्याने समाज घडविणारे संत गाडगे बाबा | 91 |
| 30 | प्रा. आर.बी. खरडे | महात्मा फुले यांचा सामाजिक समतेचा दृष्टीकोन : | 94 |
| 31 | प्रा.डॉ.लोमेश्वर आर. घागरे | महात्मा जोतिराव फुले यांचे शेती विषयक विचार | 98 |
| 32 | प्रा. डॉ. ममता इंगोले-महल्ले | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांच्या जडण-घडणीत योगदान | 100 |
| 33 | प्रा.डॉ.सविता मा.पवार | स्वामी विवेकानंदांच्या विचारसरणीचा मराठी साहित्यावरील परिणाम | 106 |
| 34 | श्री. माधव सोनेकर | सत्याग्रह व सविनय कायदेभंग गांधीजीचा – एक दृष्टिकोन | 110 |
| 35 | डॉ. निलीमा दवने | डॉ. पंजाबराव देशमुखांचे सामाजिक कार्य | 115 |
| 36 | सुकेशिनी संजय जोगदंड | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक पुनर्निर्माणाचे तत्वज्ञान | 117 |
| 37 | प्रा.कल्पना एस.गोडघाटे | भारतीय विचारंवतांचे भारताच्या सामाजिक जडणघडणीत योगदान | 122 |
| 38 | सविता सु. घरजारे | स्वा.विनायक दामोदर सावरकरांचे भारताच्या राजकीय जडण–घडणीतील योगदान | 125 |


345

Scanned by TapScanner

ISSN - 2278-9308

# स्वामी विवेकानंदांच्या विचारसरणीचा मराठी साहित्यावरील परिणाम

प्रा डॉ सविता मा पवार
कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर जि.बुलडाणा ४४३३०१

प्रस्तावना :

स्वामी विवेकानंदांच्या विचारसरणीचा आवाका फार मोठा आहे. 'माणूस' घडवणे हेच त्यांच्या शिकवणूकीचे सार होते. ज्यामुळे माणूस घडू शकेल अशा धर्माचा, तत्वज्ञानाचा त्यांनी पुरस्कार केला होता. ईश्वर म्हणूनच जीवाची सेवा करावी, देशाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक उन्नतीसाठी प्रयत्न करणे, ईश्वर हा बाहेर नाही तर तो आपल्यामध्ये आहे अशा अनुभूतीतून धर्म प्रत्यक्ष जीवनात उतरवून त्याची व्यवहाराशी सांगड घालणे अशा व्यापक आणि संपूर्ण चराचराला व्यापणाऱ्या विचारसरणीचा मराठी साहित्यावर कसा आणि कितपत प्रभाव पडला आहे, याचा बोध प्रस्तुत शोधनिबंधामध्ये घेतला आहे. विवेकानंदाच्या विचारसरणीचे प्रतिबिंब कादंबरी, नाटक, काव्य यात पडले आहे का, त्यांच्या विचारसरणीचे प्रतिनिधित्व करणारी पात्रे वा घटना या ललित वाङ्मयात दिसतात का, यादृष्टीने हरिभाऊ आपटे यांची मी तसेच भयंकर दिव्य, आजच आणि कर्मयोग या कादंबऱ्यांचा परामर्श प्रस्तुत शोधनिबंधामध्ये घेतला आहे. वा.म. जोशी यांची रागिणी, साने गुरूजी यांच्या धडपडणारी मुले, सती, शिरवाडकरांची जान्हवी, श्री.म. माटे यांची पश्चिमेचा वारा, ग.त्र्य. माडखोलकर यांची सत्यभामा आदी कादंबऱ्यावर स्वामी विवेकानंदाच्या विचारसरणीचा प्रभाव जाणवतो. श्रीरामकृष्ण व सारदादेवी यांची मराठीत पद्यमय चरित्रे निर्माण झाली. श्रीरामकृष्ण व विवेकानंद यांच्यावर काही स्फुट कविताही निर्माण झाली. मात्र एकूण मराठी कवितेवर विवेकानंदाच्या विचारसरणीचा प्रभाव झालेला दिसत नाही. स्वामी विवेकानंद हे अच्युत कोल्हटकर यांचे विवेकानंदावर लिहिलेले एकमेव नाटक आहे. यासारख्या मोजक्याच वाङ्मयकृतींवर हा परिणाम जाणवतो. त्यादृष्टीने त्या वाङ्मयकृतींचा शोध प्रस्तुत शोधनिबंधामध्ये घेण्याचा प्रयत्न केला आहे.

कादंबरी वाङ्मय :

हरिभाऊ आपटे :

हरिभाऊंच्या कादंबरीत येणारी स्वामीजींची व्यक्तिचित्रे व आश्रम मठयोजना हा पुनरूज्जीवनवादी विचारसरणीचा प्रभाव आहे. हरिभाऊंच्या पुनरूज्जीवनवादाचे मूळ चिपळूणकरांबरोबरच विवेकानंदांच्याही विचारसरणीत सापडू शकते. कारण, विवेकानंदांचीही विचारसरणी पुनरूज्जीवनवादावरच आधारलेली होती.[1] हरिभाऊंची मी ही कादंबरी १८९५ मध्ये करमणुक पत्रातून प्रसिध्द झाली. प्रस्तुत कादंबरीतील भावानंदाची व्यक्तिरेखा, त्याने केलेली मठस्थापना आणि त्याचा समाजसुधारणेचा ध्यास या गोष्टी लक्षात घेतल्या तर भोवतालच्या परिस्थितीचेच हे प्रतिबिंब असावे असे वाटते. १८९३ मध्ये विवेकानंदांनी अमेरिकेत जाऊन दिग्विजय प्राप्त केला होता. त्यापूर्वीच्या विवेकानंदांच्या भारतातील कार्याची कल्पना हरिभाऊंना अर्थातच असावी. १८८७ मध्ये श्रीरामकृष्णांच्या समाधीनंतर विवेकानंद आणि त्यांचे गुरूबंधू हे कलकत्यातील 'वडानगर' येथील एका ओसाड घरात आश्रम करून राहू लागले होते. या सर्व भोवतालच्या परिस्थितीचा सूक्ष्म परिणाम हरिभाऊंवर आणि त्यांच्या कादंबऱ्यांवर झाला असावा. प्रस्तुत कादंबरीतील भावानंदाची विचारसरणी विवेकानंदांच्या मूल्यांशी जवळीक दाखवितात.

हरिभाऊंच्या भयंकर दिव्य या कादंबरीची सुरुवात सुधारकी वातावरणाने होऊन, तिचा शेवट भावानंदाच्या मठाच्या संदर्भ देऊन पुनरूज्जीवनवादी विचारसरणीने झाला आहे. या कादंबरीत भावानंदाची बहीण ताई व त्याची मैत्रीण सुद्धा भावानंदाला अभिप्रेत असलेले मठाचे कार्य चालवित आहेत, असे दाखवले आहे, आजच या कादंबरीतील स्वामी अद्वैतानंद व स्वामी शारदानंद ही पात्रे विवेकानंदांच्या विचारांशी जवळीक साधणारी आहेत. या कादंबरीमध्ये वर्णिलेला एक प्रसंग आहे. कादंबरीतील काही व्यक्ती आगगाडीतून प्रवास करीत आहेत. त्यांच्या डब्यामध्ये दोन संन्यासी येतात. या संन्याशांना इंग्रजी येत नसावे असा कादंबरीतील प्रवास करणाऱ्या व्यक्तींचा समज असतो, परंतु या संन्याशांपैकी एक पोक्त वयाचा संन्यासी इंग्रजीत बोलतो आणि त्यामुळे त्या व्यक्ती खजील होतात. विवेकानंदांच्या जीवनात असाच प्रसंग घडलेला आहे. तो असा, इ.स. १८९२ च्या सप्टेंबर महिन्यातील गोष्ट मुंबईहून पुण्यास जाणाऱ्या गाडीतील दुसऱ्या वर्गाच्या डब्यात स्वामीजी बसलेले होते. डब्यात आणखी तीनचार महाराष्ट्रातील तरुण प्रवास करीत होते. त्यांच्यात संन्याशांची निष्क्रियता



330

या विषयावर वादविवाद चालला होता. त्यांच्यात बाळ गंगाधर टिळक हेच असे एक तरुण होते, की जे त्यांच्या मतांचे खंडन करून संन्याशांचा महिमा त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करीत होते. टिळकांची बाजू घेऊन स्वामीजींनी संन्यासाचे महत्व पटवून दिले. अस्खलितपणे इंग्रजीत बोलणाऱ्या स्वामीजींची प्रतिभा पाहून ते युवक थक्क होऊन गेले. स्वामीजींना इंग्रजी येत नसावे, असाच त्यांचा समज होता. पण स्वामीजी अगदी धीरगंभीर शब्दांत न अडखळता इंग्रजीत बोलत असलेले पाहून त्यांना चांगलाच धक्का बसला.[२] प्रस्तुत कादंबरीतील स्वामी अव्दैतानंदांनी व्यक्त केलेले विचार हे स्वामी विवेकानंदांचेच विचार आहेत, असे वाटावे इतके विलक्षण साम्य या दोघांच्या विचारसरणीत आहे. अव्दैतानंदांनी देशाला ईश्वराइतके दिलेले महत्व, अव्दैताचा केलेला पुरस्कार, कोणत्याही समस्येवर करावयाची उपाययोजना ही मुळापासूनच केली पाहिजे हा विचार, जुना धर्म नव्या काळाला अनुसरून सांगण्याची आवश्यकता या साऱ्या गोष्टी स्वामी विवेकानंदांशी साधर्म्य दाखविणाऱ्या आहेत. स्वामी अव्दैतानंदांचे व्यक्तिचित्र रेखाटताना हरिभाऊंच्या मनावर विवेकानंदांच्या विचारसरणीचा किती विलक्षण पगडा होता, हे यावरून कळून येण्यासारखे आहे. स्वामी अव्दैतानंद हरिव्दार येथे 'अव्दैताश्रम' या नावाचा मठ स्थापन करतात. अव्दैताचा प्रचार करणे हे, या मठाचे कार्य असते. अव्दैतानंदाच्या शिष्याचे नाव स्वामी शारदानंद आहे. विवेकानंदांच्या विचारसरणीचा हा वाङ्मयीन परिणाम आहे हे यावरून सिध्द होते. विवेकानंदांच्या गुरूबंधूची नावे स्वामी अव्दैतानंद व स्वामी सारदानंद अशीच होती. श्रीरामकृष्ण मिशनचा हिमालयातील मायावती येथे जो आश्रम आहे त्याचेही नाव अव्दैताश्रम असेच आहे. केवळ अव्दैत मताचा प्रचार करणे हे याही आश्रमाचे ध्येय राहिले आहे.

कर्मयोग ही हरिभाऊंची आणखी एक कादंबरी. या कादंबरीचा नायक चंद्रशेखर हा अज्ञेयवादी आहे, पण आपल्या अज्ञेयवादाला वाचा फोडील, अज्ञेयवादामुळे आपल्या मनात निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांना खरीखुरी उत्तरं देऊ शकेल, असा कुणीतरी भेटावा व त्याच्यापुढे आपले मनोगत आपल्याला प्रगट करता यावे, असेही त्याला वाटत होते.[३] स्वामी विवेकानंदांच्या बाबतीतही असेच घडले होते. ईश्वर खरोखरच आहे का? असल्यास तो आपल्याला का दिसत नाही? या प्रश्नाने नरेंद्राला खूप पछाडले होते. आपण ईश्वराला पाहिले आहे, असे छातीठोकपणे सांगणारा कुणीतरी भेटल्याशिवाय नरेंद्राची तळमळ शांत होणारी नव्हती. हरिभाऊंच्या चंद्रशेखराची थोड्याफार फरकाने अशीच अवस्था झालेली दिसते. नरेंद्राला श्रीरामकृष्ण भेटले आणि त्याचे जीवन पालटून गेले. चंद्रशेखरालाही स्वामी भेटले. स्वामींची त्याला परीक्षा घ्यावयाची असते. नंतर त्यांचे शिष्यत्व पत्करावयाचे की नाही, हे त्याला ठरवायचे असते. पण कादंबरी अपूर्ण असल्यामुळे त्याने त्या स्वामींचे शिष्यत्व पत्करले का? त्याने कोणता मार्ग पत्करला हे स्पष्ट होत नाही. परंतु कादंबरीच्या स्वरूपावरून रामकृष्णांच्या सहवासाने नरेंद्राचा जसा विवेकानंद झाला, तसा या स्वामींच्या सहवासाने चंद्रशेखराचा कुणी युगपुरूष झाला, असे हरिभाऊंना दाखवावयाचे असावे, असे वाटते. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांवर विवेकानंदांचा प्रभाव आहे हे निश्चित. परंतु या प्रभावातून हरिभाऊंना जी व्यक्तिचित्रणे स्फुरली त्यांच्यामध्ये जिवंतपणा उतरलेला दिसत नाही. विवेकानंद नीट समजू न शकल्याचाही हा परिणाम असावा. कदाचित त्यांच्या कादंबऱ्या अपूर्ण राहण्याचेही हेच कारण असावे.

**वा.म.जोशी :**

वा.म.जोशी यांच्या रागिणी या कादंबरीत थिऑसफी व श्रीरामकृष्ण मिशन या संस्थांनी सांस्कृतीक पुनरूज्जीवनाचे जे कार्य चालविले होते त्यांचे चांगलेच पडसाद पडले आहेत. या कादंबरीवरील भय्यासाहेब आत्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी आपल्या पत्नीचाही त्याग करतात. ईश्वर, ब्रम्हज्ञान, आत्मज्ञान या गोष्टी तर्काने सिध्द होण्यासारख्या गोष्टी नाहीत, ही गोष्ट भय्यासाहेब आनंदरावांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करतात. विवेकानंदांचे उदाहरण घेऊन ते म्हणतात, "नरेंद्र नावाचे एक सुशिक्षित गृहस्थ प्रथम तुमच्यासारखे तर्कज्ञानी नास्तिक होते. त्यांनी रामकृष्ण परमहंसांनी 'देव तुम्ही पाहिला आहे का व मला दाखविता का?' असा प्रश्न विचारला असता त्या परमहंसांन नरेंद्राच्या जिज्ञासेची तीव्रता कशी आहे याची प्रथम परीक्षा केली व मग त्यांना प्रत्यक्ष देवदर्शन घडविले. तोच नास्तिक नरेंद्र नंतर साधू विवेकानंद झाला! ज्याला विवेकानंदांसारखी तळमळ असेल, त्यांच्यासारख्या ज्यांच्यात दृढ निश्चय असेल, त्याला गुरू प्रत्यक्ष ज्ञान करून देतात. तुम्हा लोकांना तेवढी जिज्ञासा तर नाहीच, पण उगाच शंकाकुशंका मात्र काढता".[४]



345

ISSN - 2278-9308

प्रस्तुत कादंबरीतील एक पात्र प्रियब्रम्हस्वामी यांची जीवनदृष्टी विवेकानंदांच्या जीवनदृष्टीशी मिळतीजुळती आहे. तसेच त्यांचे एकूण जे वर्णन आले आहे त्यावर विवेकानंदांचा प्रभाव जाणवतो. प्रियब्रम्हस्वामींचे वर्णन करताना कादंबरीकाराच्या दृष्टीसमोर विवेकानंद असले पाहिजेत, असे निश्चितपणे वाटते. "मी बंगाली आहे .... मी कलकत्यातील एका हायस्कुलवर हेडमास्तर होतो. पण स्वामी विवेकानंदांची गाठ पडल्यापासून संसाराचा मला विट आला. त्यांच्या अनुग्रहाने माझी योगविद्येत व ब्रम्हविद्येत बरीच प्रगती झाली आहे."[४] असे स्वतः प्रियब्रम्हस्वामी सांगतात. तेव्हा प्रियब्रम्हस्वामींचे व्यक्तिचित्र रेखाटताना विवेकानंद आणि त्यांच्या विचारांचा प्रभाव कादंबरीकाराच्या मनावर पडलेला होता, याची खात्री पटते.

**साने गुरुजी :**

साने गुरुजी यांच्या लेखनावर गांधीवादाचा जसा प्रभाव आहे, त्याखालोखाल रवींद्रनाथ टागोर व श्रीरामकृष्ण, विवेकानंद यांच्याही विचारसरणीचे पडसाद त्यांच्या लेखनावर पडले आहेत. त्यांची 'धडपडणारी मुले' ही कादंबरी १९३७ साली प्रसिध्द झाली. या कादंबरीतील एक पात्र म्हणजे स्वामी. स्वामींच्या विचारांकडे पाहिले असता विवेकानंदांचेच विचार स्वामी बोलून दाखवित आहेत, असे वाटल्यावाचून राहत नाही. या कादंबरीतील आणखी एक पात्र म्हणजे गोपाळराव, त्यांच्या विचारांवरही श्रीरामकृष्ण मिशनने घेतलेले सेवाव्रत व माणूस घडविण्याची व त्यादृष्टीने शिक्षणाची आवश्यकता या विवेकानंदांच्या विचारसरणीचा प्रभाव दिसतो. साने गुरुजींची सती ही कादंबरी १९४० मध्ये प्रसिध्द झाली. प्रस्तुत कादंबरीतील दिगंबर हे पात्र विवेकानंदांचा प्रभाव दाखवते. तसेच दिगंबराचा तोंडवळाही विवेकानंदांशी मिळताजुळता आहे. श्रीरामकृष्णांचा व दक्षिणेश्वराच्या कालीमातेच्या मंदिराचा उल्लेख भावपूर्णतेने या कादंबरीत येतो. त्याग व सेवा ही विवेकानंदांनी सांगितलेली तत्वे साने गुरुजींनी आपल्या कादंबऱ्यांतून मांडली आहेत. महात्मा गांधीबरोबरच स्वामी विवेकानंदांच्याही विचारसरणीचे पडसाद साने गुरुजींच्या कादंबऱ्यांवर पडले आहेत, हे मान्य करूनही असे म्हणणे क्रमप्राप्त आहे की, गांधीवादाच्या बाबतीत जे झपाटलेपण गुरुजींच्या वाङ्मयात आहे, तसे विवेकानंदवादाच्या बाबतीत नाही. म्हणूनच त्यांच्या वाङ्मयात सहज डोकावून पाहिले तरी गांधी आपल्याला पटकन दिसतील तसे विवेकानंद दिसणार नाहीत. याची कारणे तत्कालीन परिस्थितीत शोधता येतील. तसेच गांधीवाद आणि विवेकानंद यांची विचारसरणी यांत पराकोटीचे साम्य आहे. काळाच्या दृष्टीनेही गांधीवाद हा तत्कालीन लेखकांना जवळचा होता.

याशिवाय जान्हवी ही वि.वा.शिरवाडकरांची कादंबरी १९५२ मध्ये प्रसिध्द झाली. या कादंबरीत महंताचा मठ आहे. महंतांचे व विवेकानंदांचे प्रेरणास्थान एकच आहे आणि ते म्हणजे वैदिक तत्वज्ञान. विवेकानंदांचे व श्रीरामकृष्ण मिशनचे जे धोरण आहे तेच महंतांचे धोरण आहे. १९६८ मध्ये प्रसिध्द झालेली ग.त्र्यं.माडखोलकर यांची सत्यभामा ही कादंबरी. तिच्यामध्ये श्रीरामकृष्ण आश्रमाचा व त्यातील संन्याशांचा काहीसा प्रभाव दाखवलेला आहे. अशाप्रकारे मराठीमध्ये काही विशिष्ट कादंबऱ्यांवर स्वामी विवेकानंद, श्रीरामकृष्ण मिशन यांच्या कार्याचा प्रभाव दिसतो.

**कथा वाङ्मय :**

विवेकानंदांच्या जीवनावर आधारलेल्या किंवा त्यांचा प्रभाव असलेल्या कथा मराठीत अपवादानेच आढळतात. वि.वि.पेंडसे यांचे विवेकानंद आणि इतर कथा हे पुस्तक १९५१ मध्ये प्रसिध्द झाले. या कथासंग्रहात एकूण सात कथा आहेत. त्यापैकी विवेकानंद ही एक कथा. या कथेमध्ये स्वामी विवेकानंद अमेरिकेतील शिकागो येथे भरणाऱ्या सर्वधर्मपरिषदेस उपस्थित राहण्यासाठी जातात व दिग्विजयी होतात, एवढेच कथानक आलेले आहे. चरित्रात्मक कथा लिहिताना लेखकाला जे स्वातंत्र्य हवे असते, ते पेंडसे यांनी घेतले आहे. कथेमध्ये कलात्मकता आहे. परंतु पुरेशा निवेदन कौशल्याच्या अभावी कथेत परिणामकारकता येऊ शकली नाही.

**कविता :**

विवेकानंदांच्या विचारसरणीने प्रभावित झालेले मराठी कवी अपवादानेच आढळतात. मे १९६५ च्या जीवनविकासच्या अंकात श्री.ना.ना.हूड यांची स्वामी विवेकानंदास ही कविता आहे. विवेकानंदांची धीरोदात्त वाणी ऐकून मनातला नास्तिकपणा लोप पावून मन सश्रध्द बनले असा भाव कवी व्यक्त करतात. जानेवारी १९८१ च्या जीवनविकासमध्ये दा.श्री.मोडक यांची श्री विवेकानंद ही कविता आली आहे. तिच्यामध्ये विवेकानंदांचे महात्म्य वर्णन केले आहे. कवी गिरीश यांची जीवनविकासमध्ये जी कविता प्रसिध्द झाली तिच्यावर विवेकानंदांचा प्रभाव जाणवतो. बेलूरमठ



346 357

Scanned by TapScanner

येथील श्रीरामकृष्णांचे मंदिर, विवेकानंदांचे मंदिर व विवेकानंदाचे निवासस्थान पाहून मनात जे भाव स्फुरले ते, गिरीशांनी श्रीरामकृष्ण मंदिरात, श्री विवेकानंद मंदिरात, श्री विवेकानंदाच्या निवासमंदिरात या कवितांतून व्यक्त केले आहे. या कविता अनुक्रमे जीवनविकासच्या मार्च १९६०, सप्टेंबर १९६० व जानेवारी १९६१ च्या अंकामध्ये प्रसिध्द झाल्या आहेत. याव्यतिरिक्त गिरीश यांच्या स्वामी विवेकानंद (जीवनविकास, ऑक्टोबर १९६३) व कन्याकुमारीचा विवेकानंद खडक (जीवनविकास, जुलै, १९६५) या आणखी दोन कविता आहेत. या कवितेतील आशय विवेकानंदांच्या विचारसरणीशी जवळीक साधणारा आहे.

**नाटक :**

स्वामी विवेकानंद हे अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे विवेकानंदांवर लिहिण्यात आलेले एकमेव नाटक आहे. स्वामी विवेकानंद या नाटकाला अच्युतरावांनीच दीर्घ प्रस्तावना लिहिली आहे. तिच्यात विवेकानंदांच्या चरित्रापासून धडा घेऊन, पुढे येण्याचे महाराष्ट्रीयनांना आवाहन केले आहे. प्रस्तुत नाटक हे पाच अंकी आहे. विवेकानंद सर्वधर्मपरिषदेच्या निमित्ताने अमेरिकेला जातात व हिंदूधर्माचे महत्व पटवून देतात असे कथानकाचे सूत्र आहे. मुख्य कथानकाला काल्पनिक उपकथानक जोडले आहे. हे उपकथानक मूळ धाग्याशी एकरूप झालेले नाही. त्यामुळे स्वामी विवेकानंदांचे व्यक्तिचित्रण पाहिजे तसे प्रभावी झाले नाही.

**समारोप :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये हरिभाऊ आपटे, वा.म.जोशी, साने गुरुजी, वि.वा.शिरवाडकर, वि.वि.पेंडसे, कवी गिरीश, अच्युत बळवंत कोल्हटकर इत्यादी लेखकांच्या ललितकृतींचा विषयाच्या अनुषंगाने शोध घेतला आहे. विवेकानंद प्रभावाच्या दृष्टीने हरिभाऊंच्या मी, भयंकर दिव्य, कर्मयोग, आजच हया कादंबऱ्या, वा.म.जोशी यांची रागिणी, साने गुरुजींची धडपडणारी मुले, सती, वि.वा.शिरवाडकरांची जान्हवी या कादंबऱ्या, अच्युत कोल्हटकर यांचे स्वामी विवेकानंद हे नाटक, वि.वि.पेंडसे यांची विवेकानंदांवरील कथा, कवी गिरीश यांच्या जीवनविकासमधून प्रसिध्द झालेल्या विवेकानंदांवरील काही कविता ही काही मोजकीच उदाहरणे सापडतात. यावरून असे लक्षात येते की, मराठी कादंबरी, कथा, नाटक, कविता यावर विवेकानंदांचा, त्यांच्या विचारसरणीचा अत्यल्प प्रभाव पडलेला दिसतो. विवेकानंदांच्या नावावर कुठलाही वाद वा संप्रदाय अस्तित्वात आला नाही, गांधीवाद व आंबेडकरवाद यासारखा विवेकानंदवाद अस्तित्वात आला असता तर गांधीवादाचे व आंबेडकरवादाचे जसे मराठी साहित्यात प्रतिबिंब पडले, तसे विवेकानंदवादाचेही प्रतिबिंब मराठी साहित्यात पडल्यावाचून राहिले नसते.

**संदर्भ टिपा :**


१. दु.का. संत, मराठी स्त्री, खं. २, कोल्हापूर, १९५७, पृ.६
२. स्वामी विवेकानंद यांचे चरित्र, ले.सत्येंद्रनाथ मुजुमदार, अनु. स्वामी शिवतत्वानंद, नागपूर, चवथी आवृत्ती, १९७४, पृ. १५४
३. ह.ना.आपटे, कर्मयोग, पुणे, तिसरी आवृत्ती, १९६५, पृ. २५-२६
४. वा.म.जोशी, रागिणी, पाचवी आवृत्ती, १९५५, पृ. १४१
५. तत्रैव, पृ ३७६
६. दा.स.गजघाटे, स्वामी विवेकानंद आणि मराठी वाङ्मय, नागपूर, पहिली आवृत्ती, २०१२, पृ. ३३०


Co-Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana



Scanned by TapScanner